महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

दुरध्वनी क्रमांक - 0257- 2220152 ई मेल - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/156, दिनांक 19 एप्रिल, 2020

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 2 मे, 2020 व दिनांक 03 मे, 2020

----0000----

क्र दंडप्र-01/कावि/2020/186 दिनांक 03 मे, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 02 मे, 2020 अन्वये लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 04 मे, 2020 पासून दिनांक 17 मे, 2020 पावेतो वाढविण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून दिनांक 03 मे, 2020 पावेतो मुदत असलेले आदेश या कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, **डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील प्रमाणे नमूद केलेल्या आदेशांना **दिनांक 17 मे, 2020** पावेतो मुदतवाढ देत आहे.

| अ.क्र | विषय | आदेश क्रमांक व दिनांक | आदेशाचा कालावधी | मुदतवाढ दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | जळगांव जिल्हा हद्दीत प्रवेश व जळगांव जिल्हयातून निर्गमन करण्यास प्रतिबंध (सिमा बंदी) | दंडप्र-01/कावि/2020/57 दिनांक 14 एप्रिल, 2020 | दिनांक 03 मे, 2020 | दिनांक 17 मे, 2020 |
| 2 | जळगांव जिल्हयातील सर्व उद्योग/कारखाने/कंपनी व तत्सम आस्थापना (अत्यावश्यक वस्तू व सेवा पुरविणा-या कंपन्या/ कारखाने/ उद्योग/व्यवसाय वगळून) पूर्णपणे बंद करण्याबाबत. **सदरचा आदेश हा ग्रामिण भाग , महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रातील एमआय डीसी क्षेत्र , आयुध निर्माण कंपनी यांना वगळून उर्वरीत क्षेत्रातील औद्योगिक आस्थापनांसाठी लागू असेल. (संबंधित आस्थापनांना** | दंडप्र-01/कावि/2020/56 दिनांक 14 एप्रिल, 2020 | दिनांक 03 मे, 2020 | दिनांक 17 मे, 2020 |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **Containment Zone मधील कामगार कामावर घेता येणार नाहीत.)** | | | |
| 3 | जळगांव शहर महानगरपालिका जळगांव ,जळगांव जिल्हयातील सर्व पेट्रोल/डिझेल पंपावर इंधन भरणेकामी वेळ, क्षेत्र व आवश्यकता निर्धारित केलेबाबतचा आदेश | दंडप्र-01/कावि/2020 /59 /2 दि. 14 एप्रिल, 2020 | दिनांक 03 मे, 2020 | दिनांक 17 मे, 2020 |

उपोद्घातात **नमूद महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 02 मे, 2020 व दिनांक 03 मे, 2020 अन्वये जळगांव जिल्हयाचा समोवश हा रेड झोन मध्ये करण्यात आलेला आहे. तथापि या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/ कावि/2020/156, दिनांक 19 एप्रिल, 2020 मधील बाबी कायम ठेवून आणि महाराष्ट्र शासनाकडील आदेश दिनांक 02 मे, 2020 मधील तरतुदींच्या अधिन राहून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.**

**A) लॉकडाऊन कालावधीत खालील बाबी / घटक / आस्थापना पूर्णपणे बंद राहतील :-**

1) सर्व प्रकारच्या देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवासी हवाई वाहतूक. (वैद्यकीय सेवा, एअर ॲम्ब्युलन्स व संरक्षण सेवांशी संबंधित घटक वगळून)
2) रेल्वे द्वारे प्रवासी वाहतुक. ( संरक्षण सेवा व श्रमीक रेल्वेगाड्या वगळून)
3) आंतरराज्य / राज्यांतर्गत सार्वजनिक वाहतूकीकरीता बस सेवा .
4) व्यक्ती / नागरीक यांची आंतरराज्य ये-जा करणे .( वैद्यकीय कारण वगळता)
5) सर्व शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक / प्रशिक्षण / कोचिंग संस्था बंद राहतील. तथापि ऑनलाईन / दुरस्थ शिक्षण प्रक्रिया सुरु राहतील.
6) सर्व सिनेमागृहे, शॉपींग मॉल्स , जिम्नॅशियम्स (व्यायाम शाळा) , क्रिडा संकुले, स्विमिंग पुल्स, पार्क्स, बगीचे, ऑडीटोरीअम्स, सभागृहे व तत्सम ठिकाणे.
7) सर्व धार्मिक स्थळे, प्रार्थनास्थळे, धार्मिक सभा, धार्मिक परिषदा, धार्मिक ठिकाणे बंद राहतील.
8) सर्व आदरातिथ्य सेवा (अत्यावश्यक सेवा वगळून)

**B) Containment Zone मध्ये घ्यावयाची दक्षता :-**

1) Containment Zone मधील 100 % रहिवासी आरोग्य सेतू ॲप चा वापर करतील याची स्थानिक प्रशासनाने खात्री करावी.
2) Contact Tracing , Home or Institutional Quarantine, सर्व घरे / कुटूंबांचे सर्वेक्षण, Severe Acute Respiratory Infection (SARI), Influenza like Illness (ILI) व अन्य तत्सम लक्षणे आढळणा-या व्यक्तींची 100% तपासणी, समुपदेशन , जागरुकता, Social Distancing बाबत सर्व संबंधित **Containment Zone** मधील नागरीकांना सजग करणे.
3) **Containment Zone** मधून कोणत्याही व्यक्तीस बाहेर जाण्यास अथवा प्रवेश करण्यास सक्त मनाई राहील. (केवळ अत्यावश्यक वैद्यकीय कारण व अत्यावश्यक वस्तू व सेवांचा पुरवठा वगळता)
4) **Containment Zone** मध्ये कोणत्याही प्रकारे Out Patient Department (OPD) आणि दवाखाने सुरु ठेवता येणार नाहीत.
5) **Containment Zone** मध्ये प्रवेश करणा-या व बाहेर जाणा-या सर्वांची विस्तृत तपशिलासह माहिती व नोंद ठेवण्यात यावी.

**C) Red Zone मध्ये असणा-या Containment Zone च्या क्षेत्रा बाहेरील सुविधांबाबत :-**

1) सर्व सायकल रिक्षा, ऑटो रिक्षा बंद राहतील . तथापि अत्यावश्यक सेवेकरीता ऑन कॉल रिक्षा सुविधा उपलब्ध असेल.

Scanned with CamScanner

2) सर्व प्रकारची केश कर्तनालये, सलून, स्पा सेंटर्स पूर्णपणे बंद राहतील.

3) ज्या बाबींना परवानगी देण्यात आलेली आहे केवळ त्याच बाबींकरीता चारचाकी वाहनांमध्ये वाहनचालकासहीत पाठीमागील सिटवर केवळ दोन व्यक्ती आणि दुचाकी वाहनाकरीता केवळ वाहन चालक यांनाच परवानगी असेल.

4) **महानगरपालिका व नगरपालिका / नगरपंचायत हद्दीतील सर्व मॉल, मार्केट कॉम्प्लेक्सेस व मार्केट बंद राहतील. तथापि मार्केट व मार्केट कॉम्प्लेक्स मधील केवळ जिवनावश्यक वस्तूंची विक्री करणारी दुकाने सुरु राहतील.**

5) **शहरी भागातील ज्या क्षेत्रात Containment Zone म्हणून घोषित करण्यात आलेले आहे ते क्षेत्र वगळून इत्तर क्षेत्रातील सर्व Standalone (Single) shops (स्वतंत्र ठिकाणी असलेली दुकाने), रहिवासी संकुलातील सर्व दुकाने, कॉलनी मधील दुकाने (Essential and Non essential दोन्ही) सुरु राहतील. तसेच सर्व संबंधित ठिकाणी Social Distancing चे पालन करणे बंधनकारक राहील.**

6) ग्रामिण भागातील **Containment Zone व** मॉल वगळता सर्व दुकाने सुरु राहतील. (Essential and Non essential दोन्ही) तसेच सर्व संबंधित ठिकाणी Social Distancing चे पालन करणे बंधनकारक राहील.

7) ई कॉमर्स कंपन्यांना केवळ अत्यावश्यक वस्तू , औषधे, वैद्यकीय उपकरणे यांचीच सेवा पुरविता येईल.

8) खाजगी कार्यालये 33 % कर्मचा-यांसह सुरु राहतील, उर्वरीत कर्मचा-यांना Work From Home ची सुविधा देता येईल.

9) शासकीय कार्यालये 33 % कर्मचा-यांच्या उपस्थितीसह सुरु राहतील. तथापि संरक्षण , आरोग्य, पोलीस , तुरुंग, होमगार्ड, सिव्हील डिफेन्स, अग्निशमन, आपत्ती व्यवस्थापन व इतर अनुषंगिक कार्यालये कोणत्याही बंधनाशिवाय सुरु राहतील.

10) तातडीने पूर्ण करावयाच्या मान्सूनपूर्व कामांसोबतच Protection of Building, Shuttering, Water Proofing, Flood Protection, Propping and Structural repairs of building, demolition of unsafe buildings इत्यादी कामे सुरु राहतील.

**D) अन्य बाबी :-**

1) राज्यांतर्गत व आंतरराज्य सर्व प्रकारची मालवाहतूक / कार्गो सेवा / पुरवठा करुन परतणारी रिकामी वाहने यांना परवानगी राहील.

2) या कार्यालयाकडील आदेश दिनांक 19/04/2020 मधील नमूद बाबींसाठी वेगळया परवानगीची गरज असणार नाही.

3) उक्त नमूद सर्व बाबींची अंमलबजावणी करण्याची अंतिम जबाबदारी त्या त्या कार्यक्षेत्रातील संबंधित Incident Commander यांची राहील. त्या त्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित शासकीय कार्यालये, शासकीय अधिकारी/ कर्मचारी संबंधित Incident Commander यांच्या निर्देशानुसार काम पाहतील.

**E) सार्वजनिक ठिकाणी घ्यावयाची दक्षता:-**

1) कोणतीही संस्था/व्यवस्थापक सार्वजनिक ठिकाणी पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्रित येणार नाहीत याची दक्षता घेतील.

2) विवाह संबंधित कार्यक्रमांकरीता 50 पेक्षा अधिक व्यक्तींना परवानगी नसेल. तथापि सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व उपस्थितांनी Social Distancing चे पालन करणे , मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील.

3) अंत्यविधीच्या ठिकाणी 20 पेक्षा अधिक लोकांना परवानगी नसेल. तथापि तथापि सदर ठिकाणी सर्व उपस्थितांनी Social Distancing चे पालन करणे , मास्कचा वापर करणे बंधनकारक राहील.

4) सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, गुटखा, मद्य/दारु यांचे सेवन करण्यास बंदी राहील.

Scanned with CamScanner

5) जळगांव जिल्हयातील पान, तंबाखू, गुटखा, मद्य/दारु यांची विक्री करणारी सर्व दुकाने बंद राहतील.

**F) कामाच्या ठिकाणी घ्यावयाची दक्षता :-**

1) सर्व कामांच्या ठिकाणी सर्व संबंधितांना मास्कचा वापर करणे बंधनकारक असेल. तसेच संबंधित आस्थापनांनी मास्कचा पुरेसा साठा उपलब्ध करुन देणे अनिवार्य असेल.

2) कामाच्या ठिकाणी सर्व मजूर / कामगार / कर्मचारी यांनी Social Distancing चे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच कामाच्या ठिकाणी ठराविक अंतराने हात धुण्यासाठी वेळा निश्चित कराव्यात.

3) कामाच्या ठिकाणी आगमन व निर्गमनाच्या ठिकाणी हात धुण्याकरीता हॅण्डवॉश, सॅनिटाईजर्स उपलब्ध करुन देणे अनिवार्य असेल.

4) सर्व मजूर / कामगार / कर्मचारी यांनी आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करुन घेणे बंधनकारक असेल, याची जबाबदारी संबंधित आस्थापना प्रमुख यांची राहील.

5) कामावर येणा-या व जाणा-या कामगारांसाठी वाहतूकीची व्यवस्था करणा-या आस्थापनांनी संबंधित वाहनात Social Distancing चे पालन केले जाईल, मास्कचा वापर, सॅनिटाईजर्सचा वापर केला जाईल याची दक्षता घेणे अनिवार्य राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 03/05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

(डॉ. अविनाश ढाकणे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
6. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
7. जिल्हा पुरवठा अधिकारी, जळगांव
8. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
9. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
10. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
11. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
12. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
13. सहायक कामगार आयुक्त,जळगांव
14. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
15. जिल्हा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,जळगांव
16. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव
17. उप अभियंता, एम.आय.डी.सी.जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner